प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

मार्च 1, 2019

**अर्बन को-ऑपरेटिव बँक लि., बदायुं, उत्तर प्रदेश ह्यांचेवर आर्थिक दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(4) सह वाचित, कलम 47अ(1)(क) खाली देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने, अर्बन को-ऑपरेटिव बँक लि., बदायुं, उत्तर प्रदेश ह्यांचेवर, रु.5,00,000/- (रुपये पाच लाख) दंड लागु केला असून हा दंड, वरील बँकेला दिलेल्या पर्यवेक्षणीय सूचना, आंतर बँकीय ठेवींवरील ढोबळ व प्रतिपक्ष एक्सपोझर मर्यादा ह्यावरील प्रुडेंशियल नॉर्म्स, गुंतवणुक व्यवहारांचे कॉंकरंट ऑडिट, व्यावसायिक संचालक, केवायसी/एएमएल मार्गदर्शक तत्वे आणि क्रेडिट इन्फर्मेशन कंपन्यांचे सभासदत्व ह्यावर आरबीआयने दिलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्वे ह्यांचे उल्लंघन केले गेल्याने लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर त्या बँकेने तिचे लेखी उत्तरही सादर केले होते. ह्या प्रकरणातील सत्य व त्या बँकेने त्यावर दिलेले उत्तर विचारात घेऊन रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की उल्लंघन झाले असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/2074**